॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
'A' Grade
(NAAC Re-Accredited)
3rd Cycle
# North Maharashtra University, Jalgaon
# उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
पत्रपेटी क्र. ८०, उमविनगर, जळगाव- ४२५००१
दूरध्वनी क्र. (०२५७) २२५७२४८, २४९, २५३ फॅक्स क्र. २२५८४०३, ४०६

## Public Relations Office — जनसंपर्क विभाग

**बातमी क्र.१**

जळगाव दि.१६ ( ) उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या प्री-पीएच.डी कोर्सवर्कला आज सोमवार, दि. १६ जुलै पासून प्रारंभ झाला. या कोर्सवर्कला चार विद्याशाखांमधील ७२३ विद्यार्थी उपस्थित आहेत.

१६ ते २१ जुलै या दरम्यान हा कोर्सवर्क होत आहे. कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील व प्र-कुलगुरु प्रा.पी.पी.माहुलीकर यांनी या वर्गाचे उद्‌घाटन केले. यावेळी मार्गदर्शन करताना कुलगुरुंनी संशोधन हे गांभिर्याने घेण्याची गरज असून कटपेस्ट संस्कृतीचा वापर न करण्याचे आवाहन केले. या कोर्सवर्कला ७२३ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. मात्र ३८ विद्यार्थी अनुपस्थित होते. ६८५ विद्यार्थी उपस्थित होते. यामध्ये विज्ञान- १६२, अभियांत्रिकी- १४८, फार्मसी- ५१, सामाजिकशास्त्रे-१६२, भाषा-८८, वाणिज्य व व्यवस्थापनशास्त्र-६६ आणि विधी-०८ अशी संख्या होती. कोर्सचे समन्वयक व उपसमन्वयक पुढीलप्रमाणे आहेत. १) अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र- अधिसभा सभागृह (समन्वयक डॉ.डी.आर.पाटील, उपसमन्वयक प्रा.जे.बी.नाईक) २) विज्ञान-पर्यावरणशास्त्र प्रशाळा (समन्वयक डॉ.डी.आर.पाटील, उपसमन्वयक प्रा. व्ही.एल.माहेश्वरी) ३) मानव्य विज्ञान आणि आंतरविद्याशाखीय विद्याशाखा- सामाजिकशास्त्र प्रशाळा (समन्वयक डॉ.पी.एम.पवार, उपसमन्वयक डॉ.लता मोरे व प्रा.मनिषा इंदाणी) ४) वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा- व्यवस्थापनशास्त्र प्रशाळा (समन्वयक डॉ.पी.पी.छाजेड, उपसमन्वयक डॉ.ए.पी.सरोदे व प्रा.सीमा जोशी) या कोर्सवर्कचे चेअरमन म्हणून प्रा.एस.टी.इंगळे काम पहात आहेत अशी माहिती उपकुलसचिव जी.एन.पवार यांनी दिली.

---

**बातमी क्र.२**

जळगाव दि. १६ ( ) उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील कला व मानव्यविद्या प्रशाळे अंतर्गत एम.ए.एम.सी.जे. पत्रकारिता, एम.ए.संरक्षण व सामरिकशास्त्र एम.ए. संगीत या पदव्युत्तर अभ्यासक्रमांना प्रवेशाची संधी उपलब्ध आहे. या अभ्यासक्रमाला कोणत्याही विद्याशाखेचा पदवीधर विद्यार्थी पात्र राहिल. त्याकरिता जनसंवाद व पत्रकारिता व संरक्षणशास्त्र आणि संगीत कला नाटय क्षेत्रात करीअर करु इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना मोठया संधी उपलब्ध आहे. प्रवेशासाठी संपर्क साधावा असे आवाहन कला व मानव्यविद्या प्रशाळेचे संचालक डॉ.तुकाराम दौड यांनी केले आहे.

---

जा.क्रं. : उमवि/१६/ हस्तदेय /२०१८ — दिनांक : १६ जुलै, २०१८

प्रति,
**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकातून प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,
स्वाक्षरीत प्रत/-
(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी